| MHKO050038072023 | कौटुंबिक हिंसाचार अर्ज क्र. ९२/२०२३ मधील निशाणी क्र.४ वरील आदेश | करूणा टिंगे<br>वि.<br>देवराज टिंगे व इतर |
|---|---|---|

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अंतर्गत दाखल केलेल्या मूळ प्रकरणामध्ये अर्जदार अंतरिम पोटगी मागत आहे. (येथुन पुढे सोयीकरीता "सदर कायदा" असे संबोधले आहे). अर्जदार अंतरिम पोटगीशिवाय घरभाडे, स्त्रीधन, संरक्षण आदेशाची मागणी केली आहे. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी अंतरिम पोटगी व्यतिरिक्त मागितलेल्या मागण्या या प्रकरणामध्ये दोन्ही बाजूचा पुरावा घेतल्यावर गुणदोषावर निर्गमित करण्यात येतील. प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी करता विचारात घेण्यात आला आहे.

अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

२. अर्जदार व वि.प. नं.१ हे पती पत्नी असुन त्यांचा विवाह हिंदूधर्म शास्त्रानुसार, रितीरिवाजानुसार व परंपरेनुसार दिनांक २९/०७/२०२१ रोजी कुलपेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे प्रेमविवाह झाला. उभयंताना अपत्य नाही. लग्नानंतर दोन महिन्यांनी अर्जदार ही वि.प. यांच्याकडे नांदत असताना वि.प. नं. २ व ३ अर्जदाराशी वाद करू लागले. सदरबाबत वि.प. नं.१ यांना सांगितले असता वि.प. नं. १ हे अर्जदार यांना शांत बसण्यास सांगत असत. वि.प.नं.१ हे कामासाठी बाहेर गेले असता वि.प.नं. २ च ३ हे अर्जदार यांना आमच्या मुलाला तुझ्यापेक्षा चांगली सुंदर मुलगी मिळाली असती, तुझ्यासोबत लग्न करूनत्यांचे स्वत:चे व आमचे जीवन उध्दवस्त केले आहे असे म्हणून र्जदारसोबत भांडणतंटा करून, अंगावर धावून जात असत. सदरची बाब अर्जदार यांनी वि.प.नं.१ यांना सांगितली असता वि.प.नं.१ हे अर्जदार यांनाच तु चुकीचे बोलतेस असे म्हणून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून मारहाण करत असत. तसेच सदरची बाब कोणालाही सांगायची नाही अशी धमकी दिली. सदरची बाब अर्जदार यांनी त्यांच्या आईवडीलांना सांगितले व समझोता करण्यासाठी अर्जदार यांचे आई वडील वि.प.

यांच्याकडे असले असता वि.प. यांनी अर्जदार हिस नांदविण्याची खात्री व हमी दिली. तद्नंतर काही दिवस सुरळीत चालले. त्यानंतर पुन्हा वि.प. हे अर्जदाराशी भांडणतंटा करू लागले, टोचून बोलू लागले, अर्जदार यांनी मोबाईलवरून त्यांच्या घरच्यांशी बोलायचे नाही, माहेरी देखील जायचे नाही असे बोलून अर्जदार यांच्या माहेरच्या लोकांना शिवीगाळ करत होते.

३. अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार यांनी वि.प. यांना तुम्हा काय बोलायचे आहे ते मला बोला परंतु माझ्या माहेरच्यांना काही बोलायचे नाही अशी विनवणी केली असता वि.प. नं. १ ते ३ यांनी अर्जदार यांना उलट उत्तर देतेस काय म्हणून शिवीगाळ करून अमानुषपणे मारहाण करून नेसत्या वस्त्रानिशी दि.३०/०१/२०२२ रोजी घरातून हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार माहेरी आल्या व वि.प. यांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी दि.३१/०१/२०२२ रोजी किटकनाशक औषधप्राशन करून स्वत:ला संपवण्याचा विचार केला. त्यानंतर वि.प.च्या माहेरच्यांनी त्यांना निरामय हॉस्पीटल येथे दाखल केले. त्यावेळी वि.प. हे हॉस्पीटलमध्ये येवून वि.प. यांना पाहून लगेच निघून गेले. त्यांनी अर्जदाराची विचारपूस केली नाही. त्यानंतर वि.प. यांनी त्यांच्या वकिलांमार्फत अर्जदार यांना नांदावयास येण्यासाठी नोटीस पाठविली त्या नोटीसीस दि.०६/०४/२०२२ रोजी अर्जदारांनी उत्तर पाठविले. त्यानंतर अर्जदार यांनी वि.प. यांना नांदायला येणेबाबत फोन केला असता तु मला सांगेन तसे लिहून दे, आम्ही तुम्हाला जसे नांदवू तसे नांदायचे नाहीतर तुला नांदवनारच नाही, माझ्या घरच्यांची माफी मागायची असे म्हणत होते. त्यानंतर मे २०२२ मध्ये अर्जदार यांना मान्य नसताना अर्जदार यांची घटस्फोट दस्तावर सही करून घेतली. त्यानंतर दि.०८/१२/२०२२ रोजी कबनूर ओढयाजवळ चहाचे टपरी जवळ अर्जदार यांना बोलावून त्यांचे मंगळसूत्र वि.प. यांनी काढून घेतले. त्यानंतर वि.प.नं.१ यांचा दि.०९/१२/२०२२ रोजी वाढदिवस असल्याने वि.प. यांच्या घरी गेले असता तु माझ्यासमोर रडून माफी मागितली असतीस तर तुला आज आम्ही नांदवले असते, आता तु आमच्या घरी यायचे नाही असे म्हणून अर्जदार हिस घरातून हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार या त्यांच्या माहेरी राहत आहेत.

४. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, वि.प. यांनी अर्जदार हिस घरातुन हाकलुन दिल्यापासुन त्यांच्या पोटापाण्याची, कपड्यालत्याची,

औषधपाण्याची कसलीही व्यवस्था केली नाही, त्यामुळे, अर्जदार ही तिचा उदरनिर्वाह भागविण्यास असमर्थ आहे. तसेच, अर्जदार हिस उत्पन्नाचे कसलेही साधन नाही. वि.प. नं. १ हे ज्युडिओ, सांगली येथे नोकरीस असून त्यांना दरमहा रू.२५,०००/-इतका पगार मिळतो. वि.प. यांचे कुपलेवाडी, ता. राधानगरी येथे शेती असून त्यांना वार्षिक रू.२,००,०००/- उत्पन्न मिळत असून कुपलेवाडी येथे प्रशस्त घर मिळकत आहे. तसेच आझादनगर कबनूर येथे घर मिळकत असून वि.प. यांची स्वत:ची ट्रान्सपोर्ट कंपनी असून त्यापासून दरमहा रक्कम रू.१५ ते २० हजार उत्पन्न मिळते. वि.प.नं.१ यांच्यावर अर्जदारशिवाय कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे, अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेच्या तारखेपासुन दरमहा रू.१५,०००/- प्रमाणे तात्पुरती स्वरुपाची पोटगी वि.प. यांचेकडुन मिळावी, अशी विनंती केली आहे.

५. वि.प. वकिल देवून हजर झाले. त्यांनी दि.११/०४/२०२५ रोजी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जातील कथने खोटी असल्याचे सांगितले आहे. वि.प. यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार व वि.प. नं.१ यांचा प्रेमविवाह असून सुरवातीचे काही महिने अर्जदार व्यवस्थित नांदल्या व त्यानंतर त्यांचे मन बदलले व त्या हट्टी स्वभावाच्या होत गेल्या. त्या वि.प. यांच्याशी सतत भांडण करत होत्या तसेच चार लोकांत वि.प. यांचा अपमान करत होत्या. त्या कधीही सासुसास-यांशी सरळ बोलत नव्हत्या. तसेच वि.प. नं.१ यांना इतर वि.प.बाबत भडकावत होत्या. अर्जदार या वारंवार वि.प. यांच्या पुर्वपरवानगीशिवाय त्यांच्या माहेरी जात होत्या. जानेवारी २०२२ मध्ये अर्जदार या त्यांच्या माहेरी वि.प.नं.१ यांची परवानगी न घेता निघून गेल्या. अर्जदार यांना नांदायला येण्यासाठी समजावून सांगितले असता प्रथमत: ती आली नाही त्यानंतर मध्यस्थींमार्फत समजावून तिला सासरी आणले. त्यानंतर दोन दिवसांनी पुन्हा अर्जदार त्यांच्या भावाला बोलावून त्यांचे सर्व साहित्य घेवून निघून गेल्या. सदरबाबतची कल्पना त्यांनी वि.प. यांना दिली नाही. दि.३१/०४/२०२२ रोजी अर्जदाराच्या भावाचा अर्जदार यांनी किटकनाशक प्राशन केल्याचे व त्यांना निरामय हॉस्पीटल येथे दाखल केल्याबाबतचा फोन आला तेव्हा वि.प.नं.१ व २ हे रात्री २.०० वाजता तातडीने अर्जदार यांना भेटावयास गेले. वि.प. यांनी अर्जदार यांना तब्येतीची विचारपूस करताना अर्जदार हे त्यांच्याशी संवाद न साधता तब्येत आणखी बिघडेल अशा वागत होत्या.

६.    वि.प.यांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार दवाखान्यामध्ये दाखल असताना वि.प. हे अर्जदारांना भेटण्यासाठी आत जाण्याचा प्रयत्न करत असताना अर्जदार यांचे वडील येवून वि.प. यांना तुमचा काही संबंध नाही, तुम्ही माझ्या मुलीला पहायला येवू नका, आमची मुलगी तुमच्याकडे नांदायला येणार नाही असे म्हणून आत सोडले नाही. वि.प. यांनी अर्जदार हिस नांदविण्याचा खूप प्रयत्न केला परंतु अर्जदार ही नांदाण्यास येत नव्हते म्हणून वि.प. यांनी अर्जदार हिस दि.०७/०३/२०२२ रोजी नांदावयास येण्याची नोटीस पाठविली. त्यानंतर दि.०६/०४/२०२२ रोजी अर्जदार यांनी त्या नांदायला यायला तयार नाहीत, आम्ही कायदेशीर कारवाई करू असे उत्तर पाठविले. अर्जदाराच्या अशा वागण्याला कंटाळून वि.प. यांनी दि.०६/०५/२०२२ रोजी स्टॅप पेपरवर दोघांच्या संमतीने नोटरी समोर वेगळे होण्याचा निर्णय घेतला व घटस्फोट घेतला. तसेच वि.प. यांना आवश्यक वाटलयास सिव्हील जज सिनिअर डिव्हीजन, इचलकरंजी या कोर्टात मॅरेज ॲक्टचे कलम १३(ब)प्रमाणे सहमती अर्ज करण्याचे मान्य केले. तसेच वि.प.यांच्या स्थावर व जंगम मिळकतीतील व भविष्यातील पोटगीचा व वि.प. यांच्या मिळकतीचा हिस्सा अर्जदारांनी कायमस्वरूपी सोडून दिला. तसेच दागिन्याच्या ताब्याबाबतही लिहून घेतले होते. वि.प. यांनी विवाह विच्छेदन होवुन मिळण्याकरिता एच.एम.पी. नं.३७५/२०२२ हा दाखल केला आहे. सदर अर्जावर नि.१ वर आदेश पारीत झाला आहे. सदरकामी अर्जदार यांनी वि.प. यांच्याकडे रू.५लाखाची मागणी केल्याने वि.प. यांनी सदरचा अर्ज चालविण्याचे नाही असे न्यायालयास कळवून काम निकाली काढले आहे. अशाप्रकारे अर्जदार ही दि.२९/०७/२०२१ रोजी नोटराईज्ड दस्त लिहून दिलेपासून व त्या अगोदर दोन महिन्यापासून ती तिच्या माहेरी राहते.

७.    वि.प. यांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही उच्चशिक्षित असून ती खाजगी नोकरी करत असून ती स्वत:चा उदरनिर्वाह करणेस सक्षम आहे. वि.प.नं.१ याला तुटपुंजा पगार असून त्याच्यावर वि.प.नं.२व ३ अवलंबून आहेत. वि.प.नं.१ यांना मणक्याचा त्रास असून महिन्याकाठी दवाखान्यास औषधोपचाराकरिता खर्च आहे. वि.प.नं.१ याच्या पगारातून काहीही रक्कम शिल्लक राहत नसलेने अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे नुकसानभरपाई व पोटगी देण्यास वि.प.नं.१ हे असमर्थ आहेत. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

८. अर्जदारचे व वि.प.यांच्या वकीलांचा युक्तिवाद विचारात घेतला त्यानुसार अंतरिम अर्जाच्या दृष्टीने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचे सकारण निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास किती? | : | अंशतः होकारार्थी. दरमहा रु.३०००/- |
| २. | काय आदेश? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ व २ बाबत -

९. सदर कायद्यातील तरतुदीनुसार शपथपत्रावर आधारुन अर्जदार अंतरिम दाद मागू शकते. वि.प.विरुद्ध अनेक कथने तिने सदर अर्जात आणि त्याच्या पृष्ठ्यर्थ दाखल केलेल्या शपथपत्रात केली आहेत. अनुक्रमे निशाणी क्र.२० व २१ लगतचे अर्जदार व वि.प. यांच्या सर्वोच्च न्यायालयाचे रजनेश वि. नेहा या न्यायनिवाडाप्राणे ऐपतिचे शपथपत्र दाखल आहेत. अर्जदाराने शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे मारहाण करुन घरातून हाकलून दिल्याने अर्जदार माहेरी राहते. वि.प.च्या त्रासामुळे अर्जदार ही सदर कायद्यातील संज्ञेनुसार “व्यथित व्यक्ती” या संज्ञेत मोडते. घरगुती जुलमाबाबत तिच्या शपथपत्रातील कथने विचारात घेता वि.प.ने तिचा मानसिक छळ करुन भावनिक दुरुपयोग केल्याचे दिसते. तसेच माहेरी गेल्यानंतर तिची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुरुपयोग केला असे सकृतदर्शनी दिसते.

१०. वि.प.नं.१ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदाराला अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. अर्जदार ही तिच्या माहेरी राहण्याच्या हट्टासाकरिता व ऐशोरामी जीवन जगण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी अर्जदाराने त्यांची कथने शाबीत केलेली नाहीत, त्यामुळे सदर कायदयाचा दुरूपयोग अर्जदार करीत आहेत. त्यामुळे अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र नाही. वि.प. यांनी त्यांच्या युक्तिवादादरम्यान मा. उच्च न्यायालयाच्या नुर अलम खाल वि. हसिना नुर अलम व इतर क्रिमिनल रिट पिटीशन नं.२०७० ऑफ २०१६

या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. मी वरील न्यायनिवाडयाचे अवलोकन केले. विवाह विच्छेदन होवनू मिळण्याकरिता एच.एम.पी. नं.३७५/२०२२ हा दाखल केला आहे. सदर अर्जावर नि.१ वर आदेश पारीत झाला आहे. सदरकामी अर्जदार यांनी वि.प. यांच्याकडे रू.५लाखाची मागणी केल्याने वि.प. यांनी सदरचा अर्ज चालविण्याचे नाही असे न्यायालयास कळवून काम निकाली काढले आहे.

११. वि.प. याच्या लेखी म्हणणेत अर्जदार ही सद्या त्यांचे सोबत रहात नाहीत ही बाब मान्य केली आहे. त्यामुळे ते माहेरी गेल्यानंतर त्यांची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुर्व्यवहार केला असे सकृतदर्शनी दिसते. अर्जदार ही सध्या वि.प. सोबत राहात नाही. अंतरिम अर्जाच्या सुनावणीस अर्जदार वि.प.क्र. १ सोबत राहते किंवा कसे आणि नसल्यास वि.प.ने त्यांची सोय केली अगर कसे हे पाहणे संयुक्तीक आहे. तसेच ईतर आरोपांबाबत मुळ अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पुराव्यावरुन निर्णीत करण्याच्या बाबींबाबत यावेळी भाष्य करणे न्यायोचित नाही. प्रस्तुत अर्जाच्या सुनावनीत दोन्ही पक्षांच्या उत्पन्नाबाबत ठोस पुरावा पाहण्याची आवश्यकता नाही. त्याबाबी प्रकरण चालल्यानंतर योग्यत्या पुराव्या आधारे निर्णीत करायचे आहे. सद्य परिस्थिती प्रकरण चालण्यात वेळ लागणार असलेने अंतरिम पोटगी सदर कायद्याच्या तरतुदी अन्वये शपथपत्र आधारुन मंजूर करता येतात.

१२. अर्जदार व वि.प.नं.१ यांच्यामधील नातेसंबंधाबाबत उभयंतामध्ये कोणताही वाद नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वि.प. नं. १ हे ज्यडिओ, सांगली येथे नोकरीस असून त्यांना दरमहा रू.२५,०००/-इतका पगार मिळतो. वि.प. यांचे कुपलेवाडी, ता. राधानगरी येथे शेती असून त्यांना वार्षिक रू.२,००,०००/- उत्पन्न मिळत असून कुपलेवाडी येथे प्रशस्त घर मिळकत आहे. तसेच आझादनगर कबनूर येथे घर मिळकत असून वि.प. यांची स्वत:ची ट्रान्सपोर्ट कंपनी असून त्यापासून दरमहा रक्कम रू.१५ ते २० हजार उत्पन्न मिळते. वि.प.नं.१ यांच्यावर अर्जदारशिवाय कोणीही अवलंबून नाही.अर्जदाराने वि.प.च्या मिळकतीबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. याऊलट वि.प.नं. १ याने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे ॲफिडेव्हीटमध्ये तो मजूरी काम करत असून त्यास मासिक रू.७,०००/- उत्पन्न मिळते. वि.प.नं.१ याने त्यांच्या उत्पन्नाबाबतचा कोणताही तपशील अभिलेखावर दाखल केलेला नाही. पत्नीला सांभाळण्याचे पवित्र

कर्तव्य वि.प.नं.१ याचे आहे, त्याने ते पार पाडणे आवश्यक आहे. वि.प.नं.१ यांचे आईवडील वृध्द असल्याचे नमूद केलेले आहे. त्यांच्या आईवडीलांच्या दवाखान्याचा खर्चाचा तपशील वि.प.नं.१ याने दाखल केलेला नाही. तसेच अर्जदारही खाजगी नोकरी करते याबाबतही वि.प.ने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदाराने वि.प. यांच्या नावे असलेल्या कबनूर येथील घरमिळकतीचा उतारा दाखल केलेला आहे. त्या उताराचे अवलोकन केले असता त्यामध्ये मालकाचे नाव मनिषा मारूती टिंगे असे आहे व कोनोली तर्फे अ चा ८ अ चा उतारा दाखल केलेला आहे. त्यामध्ये खातेदाराचे नाव भाऊ यशवंत टिंगे असल्याचे दिसून येते. त्यामध्ये क्षेत्र नमूद आहे परंतु वि.प. नं.१चे क्षेत्र किती आहे हे त्यावरून दिसून येत नाही. मारूती भाऊ टिंगे हे वि.प.नं.१चे वडील आहेत. वि.प.नं.१ हा मुलगा या नात्याने वडीलांच्या मिळक्तीमध्ये त्याचा हिस्सा आहे.

१३. अर्जदार जरी अर्थार्जन करीत असली किंवा तसे करण्यास सक्षम असली तरी पती या नात्याने पत्नीची संपुर्ण जबाबदारी पती या नात्याने वि.प.नं.१ यांची आहे. त्यामुळे उभयतांचे राहणीमान आणि सद्याच्या जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती विचारात घेता अर्जदार हीस दरमहा रु.३०००/- अंतरिम पोटगी तुर्तास वि.प.नं.१ कडून मिळणे न्यायिक आहे. इतर वि.प.कडून मागणी बाबत आदेश करणेसारखी परिस्थिती तुर्तास नाही. सबब, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी देणे न्यायोचीत आहे. म्हणून मुद्दा क्र.१ मी त्यानुसार निष्कर्षित आहे. सबब आदेश-

## आदेश

१. अर्ज अंशतः खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

   अ. सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दिनांक ३०/०८/२०२३ पासून वि.प.नं.१ याने अर्जदार हिस रू.३०००/- (अक्षरी तीन हजार रुपये मात्र) सदर कायद्याचे कलम २०(ड) अन्वये अंतरिम पोटगी दाखल पुढील आदेश होईपर्यंत द्यावेत.

२. खर्चाबाबत अंतिम निर्णयावेळी आदेश करण्यात येईल.

३. सदर आदेशाच्या प्रती सदर कायद्याचे कलम २४ अन्वये संबंधीतांना विनाशुल्क देण्यात याव्यात.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.03.04 16:54:26 +0530

**(डी.बी.साठे)**

दिनांक- ०२/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.
(न्यायालय क्र.२)